1156

1156
KOLHAṬKAR (Acyut Bāḷavant)
Navīna Śivājī athavā Nānā Pharārī pavāḍā.
Mumbaī: P.B. Pāṭhaka, [1931?].
8 p. 15 cm.
Nationalistic ballad on the exploits of the 'new Sivaji', a mythical(?) freedom fighter named Nānā Pharārī.
NAI 1528 & 1590-91
PP Mar B 14; PIB 72/3

ARCHIVES NATIONAL

P.I.E. 72 /3

नवीन शिवाजी (अथवा)

नाना फरारी पोवाडा

[illegible] (Agut B[illegible])

" नाना आला " नाना आला—पोलिस घाबरला

बोले नाना कोळी आला तो नाशिकवाला



किंमत १ आणा

NAMASHI ARCHIVES OF INDIA

श्री. अ. म. कोल्हटकर बी. ए. एल. एल. बी. कृत

नवीन शिवाजी [अथवा]

नाना फरारीचा पोवाडा.

चाल—[धन्य शिवाजी तो रणगाजी]

'नाना आला' नाना-आला-पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला॥घृ०॥
गरिबापुढें फार बडबडे ताव देइ मिशिला
आज जागच्या जागीं त्याचा दण्डुकाचि गळला
बापाला जो बाप न मानी आई न आईला
पहा कसा तो गोगलगाई सम आतां बनला
बापाचाणी डुरकत होता ' [illegible] ' [illegible]
आज फाटला बिजार त्याची फेसहि तोंण्डाला

NATIONAL ARCHIVES OF INDIA

काय ' शिपाईदादा, ऐसा प्रकार कां घडला
दबकत बोले नाना आला तो नाशिकवाला ॥१॥
' नाना आला ' नाना आला पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला
नानाकोळी, जमात भोळी, विकि लाकुड मोळी
किंवा घरुनी मच्छि मासळी कुटुंब सांभाळी
पक्षि इंग्रजी कायदा तया छळि वेळोवेळीं
फारशाचे लचांड त्याला पाडित जंजाळीं
क्यं बें अन्धे क्यं नहि देखी तारांची जाळी
' अच्छा डालूं अभी जेलमें ' सबकी सब टोळी
शम्भर वर्षे असा इंग्रजी जुलम तया जाळी
बरेक अपुल्या झोंपडीमध्यें अश्रु पहा ढाळी
मुकुन्द कोळी सच्चा; त्याचा बच्चा, ह्या वेळीं
दण्ड थोपटुनि नाना आला कोळ्यांचावाली ॥२॥
' नाना आला ' नाना आला—पोलीस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला

NATIONAL ARCHIVES OF INDIA

हिंसा कोणी करिल तयाची बंद करीन वाचा
ह्मणे ' गांधिचा भक्त असे मी भुक्त अहिंसेचा
गांजिल काणी गरिबाला जो खाइन त्या कच्चा
करिन तयाचा चट्टा मट्टा जणुं मिठभाकरीचा
महालकरि पैकीं पाटिल दादा मालक गांवाचा
फारेष्टाचा हापिसर येवो गर्व हरिन त्याचा
दीनांचा मी सखा सोयरा गोर गरीबांचा
मूर्तिमंत सैतान पातला तरि न डरायाचा
आला नाना करी सामना हरि ताठा तुमचा
काय मजपुढें पाड कुणाचा उभें राहण्याचा॥३॥
'नाना आला' नाना आला—पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला
मारवाडि बहु करी लबाडी देइ अती धोका
कवडी कवडी माया जोडी रडवितसे लोका
घुरातली ही घूसचि समजा कीं काळा बोका
सावकारिही त्याची न्यारी लुटि सारा पैका

'धीनो पैसो' पैसोनो धी करि धनमल काका
फाल्गुण शिमगा फाग-चढवितो व्याज असें केका
लिही चोपड्या पोकळ खोट्या दुप्पट घे रोखा
चुके वायदा तरी आणितो टांच शील शिका
महामारि कां ये न अशांना कां न होई वाखा
मारि उपाशी मुलें बायका देई दुःख शोका
'नका घाबरू' नका घाबरूं हांक अशी ऐका
नाना आला काळ तयांचा कापाया नाका ॥ ४॥
'नाना आला' नाना आला-पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहराही सुकला
कोणी ह्मणती तात्या टोपी पुनरपि अवतरला
कोणी ह्मणती तंट्या भिल्लें पुन्हां देह धरिला
कोणी ह्मणती फडके आला फडकत झेंड्याला
वासुदेव बळवंत कराया सर इंग्रजि किल्ला
कोणी ह्मणती झाशि वालिनें पुरुष जन्म धरिला
कोणी ह्मणती भाउ सदाशिव पानपतावरिला

कोणी ह्मणती राव उमाजी पुन्हां सजिव झाला
कोणी ह्मणती शिवरायचि हा उदयातें आला
सर्व ' बोलती नाना आला हा नाशिकवाला '
सद्दी सरली इंग्रजांचिही काळ अतां फिरला॥५॥
'नाना आला ' नाना आला—पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला
कथा आयका जवां मर्दहो या नव मर्दांची
फारेष्टाचा एक हाफिसर सर्व जनां जाची
जुलुम तयाचा सहन होईना कारकोर्द त्याची
काळि कुट्ट जाहली, सकळिका पुरे वाट साची
नानाचा बहु जीव कळवळे ईश्वरासि याची
देई संधि मज उतरण्यासि या घमेण्ड नीचाची
वेळहि आली लवकरि त्याच्या इच्छा पूर्तीची
दोऱ्या वरती स्वारी निघाली त्या सुर वष्टाची
घोड्या वरती सवार झाला घे भाला घरची
पिस्तुलही तो अडुल्या आंतिल जाकिटांत खोंची

NATIONAL ARCHIVES OF INDIA

जंगलवाला जंगलांतली आड वाट वेंची
घोडा जाई इकडे तिकडे त्या सत्वर खेंची
नाना वरती रोष तयाचा निन्दा करि त्याची
ह्मणे 'लुटारू चोर' तयाच्या थूः थूः जिनगीची
इतक्यामध्यें नाना आला मुर्वत त्या कैची !
फारिष्टावरि अरिष्ट लोटे करुं लागे चीची ॥ ६ ॥
'नाना आला' नाना आला-पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहराही सुकला
दृष्टिस पडतां फारिष्टाचा उमेट अधिकारी
नाना तयाच्या श्रीमुखांत तो दहा वेळ मारी
त्यासि विचारी कोण लुटारु कोण करी चोरीं !
गरिबांचा मी वाली नाना की तूं अधिकारी
पगार भत्ता खाउनि करितां हराम खोरि तरी
गरिबांना नाडोनि उकळितां लांच कुदळ खोरी
नेउनि येथिल लाकुड फाटा बान्धितसा कोर्ट
हुवाल तुमच्या बापाचिच ही मत्ता काय खरी

गरिबां वरती भरतां खटले फुकट फौजदारी
करितां त्याच्या घरीं उन्हाळा जगतीं या न सरी
धिक धिक तुमचें जिणें पातकी वराल नरकपुरीं
पुण्यवान मी असें तुह्मांहुनि नाना सर्वपरी
'नाना आला' इंग्रजांसही सवाल आज करी
राज्य घेतलें लबाडिनें कीं मारुनि तरवारी॥७॥
'नाना आला' नाना आला—पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेरही सुकला
वदा चोर क्लाइव्ह किंवा तो शिव छत्रपति
वदा चोर तो हेस्टिंग्जचि कीं शिन्दे प्राज्ञ अति
वदा चोर तो वेलस्ली कीं बापु वीरकीर्ति
वदा चोर तो डलहौसी कीं नाना रणशक्ति
वदा चोर तो कर्झन् किंवा नौरोजी सुमति
वदा चोर तो मॉण्टेग्यू कीं टिळक विषल वृत्ति
वदा चोर तो सायमन् किंवा गांधी वंद्य जगतीं
वदा चोर मी किंवा स्वारी तुमची मज पुढती

नाना आला चोर लुटारु जे कुणि हें वदती
त्यांसि विचारा प्रश्न चोर ते कोण खरे ठरती॥ ८॥
'नाना आला' नाना आला—पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराही सुकला
फार विरमला शरणहि आला हपिसर नानाला
पश्चात्तापें त्यानें त्याचा चरण युग्म धरिला
म्हणे करावी क्षमा जाहला पापभार याला
पुन्हां न घेइन लाँच कुणाच्या शिवेन पैशाला
मुदत सम्पतां ठेविन खाली नोकरिचा बिल्ला
मनांत विनविन राष्ट्र मुक्ततेस्तव त्या ईशाला
फिरविन चरखा घालिन खादी नमिल गांधीजीला
नित्य निवडुनि मागिन आयुर्दाय बहु त्याला
नाना आला—चोर नसे हा केवारी सकलां
जो जो कोणी दुःखित त्याच्या साधिल कार्याला॥ ९॥
'नाना आला' नाना आला—पोलिस घाबरला
नूर तयाचा पहा उतरला चेहेराहि सुकला

NAVIDIA ARCHIVES OF INDIA

घीनो पैसो पैसानो घी करि धनमल काका
फाल्गुन शिमगा फाग चढवितो व्याज असे कैका



मुद्रक व प्रकाशक:-पी. बी. पाठक
" श्री पांडुरंग वैभव प्रेस " सुर्यमहाल मुंबई नं. ४.
या पुस्तका संबंधी सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकनो ठेविले आहेत

ARTISTIC NATIONAL ARCHIVES OF INDIA